शेवटचं पान

आतापर्यंत आपण जी चर्चा केली, तीमधून चालू अर्थव्यवस्थे-ला नेमका पर्याय कोणता उभा राहतो? सर्वसामान्य नागरीकाला त्यांच्या दैनंदिन व्यवहाराच्या दृष्टीने पाहता नेमके असे प्रतिमान (मॉडेल) उभे करून दाखविता आपल्याला येईल का? सुरुवात आपण खेड्यांची रचना, तेथील अर्थव्यवस्था, तिथल्या रहिवाशांनी काय करावे, यापासून करू.

१) खेड्यांची रचना आणि राहणी ही परिसरातल्या नैसर्गिक संसाधनांची काळजी, राखण व व्यवस्थित वापर यांवर आधारली गेली पाहिजे. डोंगर, त्यांचे उतार, त्यावरून वाहणारे ओढे व प्रवाह, पायथ्याकडील सखल भागातील जमीन व त्यावरील शेती, तेथील इतर वनस्पतींचे आच्छादन (झाडे-झुडुपे, गवत), गावातील ओढा, गावातील पशुपक्षी, गावाला आवश्यक असे जंगल व गायरान, या सर्वांची काळजी घेणारे, अव्यवस्थित वापरावर लक्ष ठेवणारे, चमू गावात तयार झाले पाहिजेत. त्यांना या गोष्टींचे प्रशिक्षण देण्याची सोय गावातच हवी. गावातील आरोग्य, संडास-मोऱ्या, सांडपाणी यांची योग्य व्यवस्था राखणारी यंत्रणाही गावात पाहिजे. ग्रामपंचायतींनी असे चमू तयार करून त्यांच्याकडून परिसरातील निसर्ग-संपत्ती, गावाचे आरोग्य व स्वच्छता, गावा-ची रचना व मांडणी (यामध्ये घरबांधणी व आखणी, रस्ते, गटारे, पाणी-पुरवठा वगैरे सार्वजनिक सुविधा आल्या) यांची व्यवस्था व नियोजन करून घ्यायला हवे.

२) गावाची शेती हा सामाजिक विषय आणि आवश्यकता आहे. इतिहास सांगतो की शेतीत अतिरिक्त (सरप्लस) उत्पादन झाले तरच संस्कृती फोफावते. तेव्हा शेती व तीपासूनचे अतिरिक्त उत्पादन हे मानवी प्रगतीचे मूळ आहे. तेव्हा शेतीची जबाबदारी संपूर्ण गावाने उचलायला हवी. जमिनीची मालकी खाजगीच राहिली, तरी गावाच्या प्राथमिक गरजा भागतील, शेतीतून अतिरिक्त उत्पादन व विक्रीयोग्य माल तयार होईल, असे शेतीचे नियोजन संपूर्ण गावाच्या सहभागा-तून झाले पाहिजे. वैयक्तिक शेतकऱ्याची अनिश्चितता व ओझी यांमुळे खूपच कमी होईल. प्राथमिक गरजा भागविणे हा अग्रक्रम. त्यानंतर अतिरिक्त उत्पादन, विक्रीयोग्य माल तयार करण्यासाठी ग्रामसभेने आपले वैशिष्ट्य कशात आहे, याचा शोध घेऊन त्यावर आधारीत माल तयार करायला हवा. उदा. आंब्याची, उत्तम वाणे काही गावात असतील, काही ठिकाणी पौष्टिक फळे, भाज्या, उत्तम प्रतीचा चारा, जंगलातून मिळणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी (औषधी वनस्पती वगैरे) असतील. अशा वैशिष्ट्यांना जोपासून त्यापासून विक्रीयोग्य माल गावातच बनविता आला पाहिजे.

३) म्हणजेच शेतीला पूरक अशी तंत्रे, अवजारे, तज्ञ मंडळी, कसबी कारागीर,

शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग गावात व गावाच्या परिसरातच निर्माण झाले पाहिजेत. या दृष्टीने गावातील शाळा व शिक्षणसंस्था यांची पुनर्रचना हवी.

4) शेती यशस्वी होण्यासाठी, गावाची भरभराट होण्यासाठी, गावाचे परिसरातील नैसर्गिक विविधता वाढवून, निरनिराळ्या प्रकारचे आसरे, निवारे राखले पाहिजेत. म्हणजे त्यांतून सरपण, चारा, इमारती लाकूड, शेतीला पूरक कच्चा माल उपलब्ध होईल, गावाच्या गरजा स्वस्तात भागतील आणि विक्रीयोग्य मालाचे उत्पादनही होईल. असे आसरे, निवारे म्हणजे डोंगरमाथ्यावरील जंगल, डोंगरउतारा-वरील गवते, झुडुपे व झाडे, डोंगरावरून खाली येणारे झरे व प्रवाह, त्यांच्या काठावरील वनस्पती, पात्रातील आसरे, पायथ्याकडील शेतांचे बांध व त्यावरील वनस्पती, जैविक कुंपणे, वादळापासून रक्षण करण्यासाठी केलेली वृक्षलागवड, गायरान-त्यावरील स्थानिक गवते, झुडुपे; गावतळे किंवा जलमय भूमी, गावातील ओढ्याचे पात्र, त्यातील आसरे आणि काठावरील वनस्पतीजीवन, गावाच्या गरजा पुरविण्यासाठी खास राखलेले जंगल, गावातील जुने, पुराणे स्थानिक वृक्ष वगैरे.

या सर्वांमुळे गावे स्वयंसिद्ध, स्वयंप्रेरित राहून, गावातील लोकांचे राहणीमान, आरोग्य सुधारेल, त्यांना नोकरी धंद्यासाठी शहरांवर अवलंबून राहण्याची पाळी येणार नाही. नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची (उदा. अवर्षण, भूकंप, वणवे) गावाची क्षमता दुणावेल. गावातून ठराविक प्रमाणात, ठराविक दर्जाचा, व विविध असा माल शहरांकडे जाईल. त्याची व्यवस्था ग्रामसभेने केली तर गावाला चांगला भाव, मोबदला मिळेल. वैयक्तिक शेतकऱ्याचे वाह-तुकीचे, बाजारपेठेचे प्रश्न सुटतील. शेतीला चारा उत्पादन, पशुपालन, कोंबड्या पाळणे, कुटिरोद्योग, जलमय भूमीपासून उत्पादने, अशी जोड दिली तर शेती नेहमीच फायदेशीर राहील. गावपातळीवर या सर्व गोष्टी झाल्यास त्यांचे नियोजन व अंमलबजावणी चांगली होईल.

5) शेतीच्या पाण्याच्या व पाण्याच्या इतर गरजा भागविण्यासाठी हायड्रॉलिक संस्कृतीऐवजी हायड्रॉलॉजिकल संस्कृती स्वीकारणे फायद्याचे ठरेल. म्हणजे गावाचे सिंचन व पाणीपुरवठा मुख्यत: झरे, शेततळी, जलमय भूमी व भूगर्भातील साठे (विहिरी) यांपासून व्हावा पाहिजे. धरणे, कालवे यांतून नव्हे. निसर्गाची, त्यांतील आसरे, निवारे यांची योग्य राखण, संवर्धन झाल्यास अवर्षणावर मात करता येईल, एवढा पुरवठा गावातच तयार होईल. त्यातूनही अतिरिक्त पुरवठा उपलब्ध झाल्यास तो शहरांना पाठवून गावांकडून शह-रांच्या गरजा भागविल्या जातील आणि त्यानुसार शहरांची वाढ मर्यादित होईल. शहरातील जीवनाचा दर्जा सुधारेल, सरकारी धरणयोजनांवर अवलंबून रहावे लागणार नाही.

6) खरं तर हायड्रॉलिक संस्कृती ही जलसिंचित उत्पादनास आवश्यक तेवढीच

वापरली जावी. पाणी आणि ऊर्जा यांच्या बाबीच्या गरजा हायड्रॉलॉजिकल संस्कृतीने भागविल्या पाहिजेत. जलविद्युत निर्मिती कमीत कमी खर्चात कुठे होईल, अशा विकेंद्रित जागीं धरणांची योजना हवी. देशातील प्रत्येक ओढा आणि नदी प्रदूषित करण्याऐवजी, सांडपाणीच सगळीकडे पसरविण्याऐवजी हायड्रॉलिक संस्कृतीचा प्रसार व्हावा.

५) खेडीं आणि शहरें परस्परांना पूरक असावीत. खेड्यातील जनतेच्या कला, साहित्य, समाजशास्त्र, सायन्स, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी याबाबतच्या उच्च शिक्षणाच्या गरजा शहरांनी भागवाव्या.

६) शहरातील उद्योगधंदे व व्यवसाय, व्यापार, हे दिवसेंदिवस खनिज व खनिज तेल यांचा वापर कमी करून सौर ऊर्जा, जैविक ऊर्जा व माल यांवर आधारीत असावेत. खेड्यांप्रमाणेच शहरांनी आपापले वैशिष्ट्य किंवा वैशिष्ट्ये जपावीत. (निरनिराळ्या क्षेत्रातील, उदा. कला, वाङ्मय, नाट्य, क्रीडा, करमणूक, वैद्यकी, आरोग्य, विशिष्ट तंत्रे व अभियांत्रिकी, निसर्गाबद्दलचे विशेष ज्ञान वगैरे). आयात, निर्यात व्यापार अशा वैशिष्ट्यांवर आधारीत असावा. शहरांनी कार्बनवर आधारीत अर्थव्यवस्था हळूहळू सोडून देऊन कार्बोहायड्रेटवर आधारीत व्यवस्था स्वीकारायला हवी. त्यामुळे खेडी व शहरे एकमेकांशी जोडली जातील; आणि सापेक्ष टंचाई, बाजारपेठेचे वर्चस्व, बड्या कॉर्पोरेट उद्योगाचे वर्चस्व, कर्ज व फेक दो संस्कृती, जागतिकीकरण यांपासून अर्थव्यवस्था, राज्ये, देश व जनता मुक्त होतील!